# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः29.10.2025 वारःबुधवार

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत भारत समुद्री सप्ताहामध्ये जगभरातील प्रतिनिधींच्या परिषदेला संबोधित करणार
2. रबी हंगामासाठी खतांवर 37 हजार कोटी अनुदान देण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय, आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींनाही मंजुरी
3. विकसित महाराष्ट्र 2047 च्या धोरण दस्तऐवजाला राज्यमंत्रिमंडळाची मान्यता आणि
4. राज्यातील अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना आणखी 11 हजार कोटी रुपयांचं येत्या 15 दिवसात वितरण

**पंतप्रधान-मेरीटाईम**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर येत असून सागरी क्षेत्रात काम करणाऱ्या जगभरातील प्रतिनिधींच्या परिषदेला ते संबोधित करणार आहेत. भारत समुद्री सप्ताह 2025 या सागरी परिषदेमध्ये होणाऱ्या जागतिक सागरी मुख्य कार्यकारी अधिकारी मंचाचे अध्यक्षपदही ते भूषवतील. या परिषदेतील पंतप्रधानांच्या सहभागामुळे सागरी अमृत काल धोरण 2047ला सुसंगत महत्त्वाकांक्षी आणि भविष्यकालीन सागरी परिवर्तनासाठी असलेली वचनबद्धता अधोरेखित होत आहे. परिषदेत 85 हून अधिक देशांतील एक लाखाहून अधिक प्रतिनिधी सहभागी होणार असून, साडेतीनशेहून अधिक आंतरराष्ट्रीय वक्ते सहभागी होणार आहेत.

**केंद्रीय मंत्रीमंडळ निर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत रबी हंगामासाठी खतांवर 37 हजार 952 कोटी रुपयांच्या अनुदानाला मंजुरी देण्यात आली. बैठकीनंतर वार्ताहरांना माहिती देताना, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, अनुदानित दर 1 ऑक्टोबरपासून लागू होतील, त्यामुळे शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरांत खतं उपलब्ध होतील. आंतरराष्ट्रीय पातळीवरील खतांचे दर लक्षात घेऊन नवीन दर निश्चित केल्याचं वैष्णव म्हणाले. शेतकऱ्यांना रबी हंगाम 2025-26 साठी मंजूर दरांवर आधारित डाय अमोनियन फॉस्फेट, नत्र, स्फुरद, पालाश, सल्फर एनपीकेएस श्रेणीसह खते सहज उपलब्ध होणार आहेत.

**आठवा वेतन**

आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींनाही काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यासाठी न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना करण्यात आली असून, अठरा महिन्यांच्या आत आयोग शिफारशी करेल. याचा लाभ 50 लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांना होणार असून, विविध मंत्रालयं, राज्य सरकारे यांच्याशी चर्चा केल्यानंतर संदर्भ अटी निश्चित केल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

**विकसित महाराष्ट्र व्हिजन**

मुंबईत काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत, विकसित महाराष्ट्र 2047 च्या धोरण दस्तऐवजाला मान्यता देण्यात आली. त्याच्या अंमलबजावणीसाठी विकसित महाराष्ट्र धोरण व्यवस्थापन एकक स्थापन करण्यासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या अंतर्गत 16 क्षेत्रीय गट स्थापन करण्यात येणार असून प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक, आणि सुशासन या चार प्रकारांत 100 उपक्रम राबवले जाणार आहेत. याशिवाय मंत्रिमंडळाच्या बैठकीत अन्य काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या नव्या ब्रॉडगेज रेल्वेमार्गासाठी अतिरिक्त साडेसोळाशे कोटी रूपयांच्या निधीसह सुधारित अंदाजपत्रकाला मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पामुळे तुळजापूर शहर शक्तीपीठ रेल्वेमार्गाशी जोडलं जाणार आहे.

त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत मिळणार आहे. त्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्यासही बैठकीत मंजुरी मिळाली. धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर इथं जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय तसंच दिवाणी न्यायालय स्थापन करण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागातल्या राजशिष्टाचार विभागात, परकीय थेट गुंतवणूक, परदेशस्थ नागरिकांचे विषय आणि आंतरराष्ट्रीय संपर्क या तीन कार्यासनांसह विस्तारास मंजुरी देण्यात आली. त्यामुळं गुंतवणुकीला प्रोत्साहन, परदेशी मराठी नागरिकांसोबत संपर्क वृद्धिंगत करणं शक्य होणार आहे.

**अतिवृष्टी भरपाई**

राज्यातल्या शेतकऱ्यांना दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय काल मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अतिरिक्त 11 हजार कोटी रुपयांचं वितरण करण्यास विशेष बाब म्हणून बैठकीत मंजुरी देण्यात आली. राज्यात निधीची कमतरता नसून, पुढील पंधरा दिवसांत ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश देण्यात आल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितले, ते म्हणाले...

**आतापर्यंत या अंतर्गत आठ हजार कोटी रुपये रिलीज झालेले आहेत. जवळपास चाळीस लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये पैसे पोहोचलेले आहेत. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत अजून अकरा हजार कोटी रुपये रिलीज करण्याला मान्यता देण्यात आली, कारण हे बजेट मधले पैसे नसल्यामुळे याला विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली. आता हेही पैसे पुढच्या पंधरा दिवसांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यापर्यंत पोहोचवण्याचे आदेश आम्ही दिलेले आहेत. एक सुदैवाने ॲग्री टॅक्सचा डेटा असल्यामुळे ॲग्री टॅक्स चे जे अकाउंट होल्डर आहेत. या कोणाचेही आम्ही ई केवायसी करत नाहीये अन्यथा ई केवायसी लाच एक महिना लागला असता फक्त एखाद्या केसमध्ये जिथे ॲग्री स्टॅक मध्ये नाव नाही आणि एलिजिबिलिटी आहे त्यांचंच केवळ ई केवायसी आपण करतोय त्यांनाही आपण पहिले मदत देऊ त्याच्यानंतर मग ई केवायसी करू असाही निर्णय आपण केलेला आहे.**

राज्यातल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी 32 हजार कोटी रुपयाची मदत जाहीर करण्यात आली आहे. त्यातील 8 हजार कोटी रुपये वितरीत करण्यात आले असून त्याचा लाभ 40 लाख शेतकऱ्यांना झाला आहे असंही मुख्यमंत्री म्हणाले. शेतमालाच्या खरेदीसाठी राज्यात नोंदणी सुरू होत असल्याचं सांगून शेतकऱ्यांनी नोंदणी करावी असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केल आहे. नोंदणी करून शासकीय खरेदी केंद्रांवर किंवा हमीभावाप्रमाणंच खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांनाच शेतकऱ्यांनी मालाची विक्री करावी असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**तुळजापूर रेल्वे मार्ग-धाराशिव**

राज्य मंत्रिमंडळानं सोलापूर तुळजापूर धाराशिव या रेल्वे मार्गासाठी वाढीव तरतुदीला मान्यता दिल्यामुळं तुळजापूर तीर्थक्षेत्र रेल्वेच्या नकाशावर येणार असून धाराशिव या आकांक्षित जिल्ह्यात दळणवळणाच्या सोयी वाढतील तसंच जिल्ह्याच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे. याबद्दल तुळजापूरचे भाजपा आमदार राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील यांनी राज्य सरकारचे आभार मानले आहेत...

**आजच्या निर्णयामुळे धाराशिवकरांना न्याय मिळणार आहे आणि रेल्वे जी आहे ती सोलापूरहून तुळजापूर तुळजापूरहून धाराशिव पर्यंत येणार आहे. आपलं तुळजापूर तुळजाभवानीचं तुळजापूर हे आता रेल्वेच्या नकाशावरती येईल आणि धाराशिवला जंक्शन होणार आहे तर या महत्वाच्या निर्णयाबद्दल आणि आर्थिक तरतुदीबद्दल मंत्रिमंडळाची आणि खास करून देवेंद्रजी फडणवीस साहेबांचे मनापासून आभार..**

**मुंबई जलवायू आठवडा**

मुंबईत पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये मुंबई तापमान सप्ताह ही जागतिक स्तरावरील परिषद आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा काल मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. प्रोजेक्ट मुंबई या संस्थेच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारण्यात येणार आहे.

**कृषी संजिवनी**

बदलत्या हवामानाला तोंड देत परवडणारी शेती करण्यासाठी जागतिक बँकेच्या सहकार्यानं नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प राबवण्यात येत आहे. शेतकऱ्यांना आणि शेतकरी गटांना लाभ देण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील थेट लाभ हस्तांतरण प्रणालीचं अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल करण्यात आलं. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित होते. प्रकल्पाचा दुसरा टप्पा राज्यातल्या 21 जिल्ह्यांमधील सात हजाराहून अधिक गावांमध्ये राबवण्यात येणार आहे.

**साखर कारखाने कारवाई**

राज्यातला उस गाळप हंगाम एक नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. मात्र अधिकृत हंगाम सुरू होण्यापुर्वी विनापरवाना गाळप सुरू करणाऱ्या पाच साखर कारखान्यांवर साखर आयुक्तालयानं कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. हे कारखाने सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील असून, संबंधितांना सुनावणीसाठी बोलावण्यात आलं आहे.

**यात्राड्रोन-सोलापूर**

कार्तिक वारीसाठी पंढरपूरमध्ये होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता, सोलापूरच्या ग्रामीण भागातील काही धार्मिक स्थळांना ड्रोन प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलं आहे. विना परवानगी ड्रोन चित्रीकरण करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा स्थानिक प्रशासनानं दिला आहे.

**शिष्यवृत्ती**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीनं यंदा इयत्ता चौथी आणि सातवी वर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र संबंधित शाळांनी परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती भरण्यास सुरुवात करावी असं आवाहन परिषदेनं केलं आहे. या परीक्षेसंदर्भातील माहिती परिषदेच्या संकेतस्थळावर प्रकाशित केली जाणार असल्याचंही परिषदेनं जाहीर केलं आहे.

**गवाणकर-निधन**

ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर याचं मुंबईत सोमवारी रात्री उशिरा निधन झालं. ते 86 वर्षांचे होते. वस्त्रहरण या मालवणी भाषेतल्या नाटकाद्वारे ते नामवंत झाले होते. गवाणकरांवर खासगी रूग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचं निधन झालं. मालवणी बोलीचा गोडवा आणि ठसका जगभरात पोहोचवणाऱ्या प्रतिभावंताला मुकलो अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मालवणी भाषेला स्वतंत्र ओळख करून देणाऱ्या सर्जनशील नाटककार गमावला या शब्दांत आदरांजली वाहिली आहे. वस्त्रहरण, वात्रट मेले, दोघी, वन रूम किचन, वर भेटू नका, वरपरीक्षा अशी गंगाराम गवाणकर यांची नाटकं गाजली होती.

**हवामान**

पाच नोव्हेंबरपर्यंत राज्यभर ढगाळ वातावरण राहण्याची तसंच हलका ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. येत्या काही दिवसांत राज्यात, विशेषतः कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात या हवामानाचा अधिक प्रभाव दिसण्याचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.